admn22-23


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER
कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com संकेतस्थळ : www.mcaer.org दूरध्वनी (०२०) २५५२८६८८


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४०२२/ 2ey

दि.३१ जानेवारी,२०२३

## परिपत्रक

**विषयः- आचार्य पदवी प्रवेश प्रक्रिया २०२२-२३**
**प्रवेश अर्ज दाखल करण्यास मुदतवाढ देणे व त्यानुसार वेळापत्रक सुधारीत करणेबाबत.**

सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील आचार्य पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया दि.१६/१/२०२३ पासून सुरु झालेली असून नियोजित वेळापत्रकानुसार ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्याचा अंतिम दि.३१/१/२०२३ आहे. तथापि, कृषी विद्यापीठाकडून काही विद्यार्थ्यांचे पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे अंतिम निकाल प्राप्त झालेले नसल्याने त्यांना आचार्य पदवी प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रविष्ट होता येत नाही. उक्त विषयी दि.३०/०१/२०२३ रोजी झालेल्या संचालक (शिक्षण) समन्वय समितीच्या बैठकीमध्ये ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्यास मुदतवाढ देण्याबाबत सहमती दर्शविण्यात आली.

अशा प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्याच्या दृष्टिकोनातून आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेंतर्गत ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्याच्या मुदतीत वाढ करण्यात येत असून आचार्य पदवी प्रवेश प्रक्रिया २०२२-२३ चे सुधारीत वेळापत्रक खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कार्यक्रम | दिनांक | सुधारीत दिनांक |
|---|---|---|---|
| १ | ऑनलाईन प्रवेश अर्ज व त्यासोबतची अनिवार्य / आवश्यक ती स्कॅन केलेली कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावयाचा अंतिम दिनांक | ३१/०१/२०२३ | ०७/०२/२०२३ |
| २. | एसएमबी व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अंतरिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी दिनांक | ०२/०२/२०२३ | ०९/०२/२०२३ |
| ३. | ऑनलाईन पध्दतीने हरकत नोंदणीचा कालावधी | ०३/०२/२०२३ ते ०६/०२/२०२३ | १०/०२/२०२३ ते १३/०२/२०२३ |
| ४. | एसएमबी व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अंतिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | ०८/०२/२०२३ (संध्याकाळनंतर) | १५/०२/२०२३ (संध्याकाळनंतर) |
| ५. | (i) पहिल्या प्रवेश वाटप फेरीच्या यादीची प्रसिध्दी | १०/०२/२०२३ (संध्याकाळनंतर) | १७/०२/२०२३ (संध्याकाळनंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा कालावधी | १३/०२/२०२३ व १४/०२/२०२३ (सायं. ५.३० पर्यंत) | २०/०२/२०२३ व २१/०२/२०२३ (सायं. ५.३० पर्यंत) |

admn22-23

| अ. क्र. | कार्यक्रम | दिनांक | सुधारीत दिनांक |
|---|---|---|---|
| ६. | (i) दुसऱ्या प्रवेश वाटप फेरीच्या यादीची प्रसिध्दी. (रूपांतरासह) | १६/०२/२०२३ (संध्याकाळनंतर) | २३/०२/२०२३ (संध्याकाळनंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा कालावधी | २०/०२/२०२३ व २१/०२/२०२३ (सायं. ५.३० पर्यंत) | २४/०२/२०२३ व २५/०२/२०२३ (सायं. ५.३० पर्यंत) |
| ७. | रिक्त जागांच्या यादीची प्रसिध्दी | २२/०२/२०२३ | २६/०२/२०२३ |
| ८. | तिसरी प्रवेश वाटप फेरी (**परिशिष्ट 'जे'** येथील कार्यपध्दतीनुसार) | २४/०२/२०२३ व २५/०२/२०२३ | २८/०२/२०२३ व ०१/०३/२०२३ |
| ९. | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | २७/०२/२०२३ | ०१/०३/२०२३ |

**मा.महासंचालक यांच्या मान्यतेने**

31/01/2023

(उत्तम कदम)
संचालक (शिक्षण)

प्रतः-

१. कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी यांना माहितीसाठी सादर.

२. मे. विबास टेक्नोलॉजी , पुणे यांना सूचित करण्यात येते की, सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

३. मे.एसएमबी सिस्टमस् प्रा.लि. विश्वकुटीर, शंकर घानेकर मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई ४०००२८ यांना सूचित करण्यात येते की, वरील सुधारीत परिपत्रकाबाबत संबंधित विद्यार्थ्यांना भ्रमणध्वनी संदेशाद्वारे अवगत करून त्याप्रमाणे वेळोवेळी प्रवेश प्रक्रियाविषयक कार्यवाही करावी.